**सामान्य प्रशासन विभागाच्या अधिपत्याखालील**
**माहिती व जनसंपर्क महासंचालनालय**
**महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई**

नवीन प्रशासकीय भवन, १७ वा मजला, आस्थापना शाखा, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालयासमोर, मुंबई- ४०० ०३२, दूरध्वनी क्रमांक – (०२२) २२०२४०५०.

---

सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, क्रमांक सीबीई१५२५/प्र.क्र.३७/आस्थाम(का.१३), दि.१०.६.२०२५ अनुसार, **माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई येथे** "विवक्षित स्वरुपाचे काम" करण्यासाठी, नामिकासूची तयार करण्याकरिता पुढीलप्रमाणे आवश्यक अर्हता नमूद करण्यात येत आहे.

**विवक्षित सेवा/कामाचे स्वरूप :**

१) महासंचालनालयाच्या मुख्यालयातील आणि क्षेत्रीय कार्यालयासाठी आस्थापना विषयक बाबी, योजनेच्या खर्चासाठी प्रशासकीय आणि वित्तीय मान्यता, देयके इ. अनुषंगिक बाबी.

२) महासंचालनालयातील वर्ग-१ आणि वर्ग-२ मधील सरळसेवा/पदोन्नतीची बिंदूनामावली तयार करणे आणि मान्यतेकरिता शासनास सादर करणे पदोन्नतीचे प्रस्ताव परिपूर्ण तयार करून सादर करणे.

३) वरिष्ठांनी सोपविलेली अनुषंगीक इतर कामकाज.

**वय, अर्हता व अनुभव खालील प्रमाणे असेल :**

१. उमेदवाराची वयोमर्यादा कमाल ५९ ते ६४ वर्षापर्यंत असावी.

२. उमेदवार अधीक्षक किंवा समकक्ष पदावरील प्रशासकीय क्षेत्रातील संबधित पदावरी कामाचा किमान २ वर्षापेक्षा जास्त अनुभव असावा.

३. करार पध्दतीने नियुक्त करावयाचा सेवानिवृत्त अधिकारी शारीरिक, मानसिक वा आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा, तसेच प्रस्तावित सेवेसाठी त्याच्याकडे आवश्यक क्षमता असावी.

४. करार पध्दतीने नियुक्त करावयाच्या सेवानिवृत्त अधिकारी यांच्याविरुध्द कोणतीही विभागीय चौकशीची कार्यवाही चालू प्रस्तावित नसावी किंवा अशा चौकशी प्रकरणी कोणतीही शिक्षा झालेली नसावी.

**पदसंख्या** : एकूण-१ पद
(पदांची संख्या कमी/जास्त करण्याचे अधिकार शासनाकडे राखून ठेवण्यात येत आहेत.)

**कालावधी** : १ वर्षाकरिता (आवश्यतेनुसार कालावधी कमी/जास्त नूतनीकरण करता येईल)

**मासिक पारिश्रमिक** : शासन निर्णय दि.१०.०६.२०२५ मधील परिच्छेद (२) ( ड) अनुसार देय राहिल.

**इतर अटी व शर्ती** : शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. सीबीई १५२५/प्र.क्र.३७/ आस्थाम(का.१३), दि.१०.६.२०२५ अन्वये विनियमित करण्यात आलेल्या सर्व अटी व शर्ती लागू राहतील.

इच्छुक सेवानिवृत्त अधिकाऱ्यांनी त्यांचे अर्ज, आवश्यक त्या शैक्षणिक अर्हता व अनुभवाच्या प्रमाणपत्रासह ही जाहिरात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून १० कार्यालयीन दिवसांच्या आत उपरोक्त कार्यालयात सादर करावेत. पोस्टामार्फत विहित कालावधीनंतर प्राप्त होणारे अर्ज स्विकारण्याचे/नाकारण्याचे तसेच निवड प्रक्रिया बाबतचे सर्वअधिकार महासंचालनालयाकडे राखून ठेवण्यात येत आहेत.

**महासंचालक,**
**माहिती व जनसंपर्क महासंचालनालय**

---